पोलीस अधीक्षक , कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

---

# प्रेसनोट क्र.४५ दिनांक २४/०८/२०२२

## पालघर पोलीस दलाकडुन "ऑपरेशन ऑल आऊट", जिल्हा पोलीस अधीक्षकांसह ६२ पोलीस अधिकारी व ३२३ पोलीस अंमलदारांनी राबविले अभियान, २६१ वाहन धारकांवर गुन्हे दाखल, ०६ पाहीजे असलेले आरोपी अटक, दारुबंदी कायद्याप्रमाणे २१ गुन्हे दाखल, अंमली पदार्थ विरोधी कायद्याप्रमाणे २ गुन्हे दाखल, १२७ निगराणी बदमाशांची एकाच वेळी तपासणी.

जिल्हा पोलीस अधीक्षक पालघर श्री. बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक, पालघर श्री. प्रकाश गायकवाड, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचेसह ३२३ पोलीस अंमलदारांच्या सक्रीय सहभागातुन दिनांक २३/०८/२०२२ रोजी **"ऑपरेशन ऑल आऊट"** राबविले. सदर अभियानाचा मुख्य उद्देश हा सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व पोलीस अमंलदार हे वरीष्ठ अधिकांऱ्याच्या नेतृत्वाखाली सर्व समावेशक व आक्रमक कारवाई करुन गुन्हेगांरावर विविध कायद्यातंर्गत परीणामकारक कारवाई करतील. जिल्हयातील गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक पालघर श्री. बाळासाहेब पाटील यांनी सदरचे अभियान राबविण्याचे निश्चित केले व सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सविस्तर सुचना दिल्या. सदरचे अभियान हे दिनाक २३/०८/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता सुरु होऊन रात्री २२.०० वाजता संपले. हे अभियान एकुण महत्वाच्या ३ टप्प्यामध्ये पार पाडण्यात आले.

i) नाकाबंदी
ii) ॲक्शन टिम/हंटर टिम- कारवाई पथक
iii) कोम्बिंग ऑपरेशन- गुन्हेगार लपण्याच्या वस्त्यामध्ये मोठया संख्येने मनुष्यबळाने जाऊन संपुर्ण क्षेत्र पिंजून काढणे व गुन्हेगारांचा शोध घेणे.

सदरचे अभियान पालघर जिल्हयामध्ये अत्यंत प्रभाविपणे राबविण्यात आले. या अभियाना दरम्यान गुन्हेगांरावर वचक निर्माण करण्यासाठी व सर्वसामान्यामध्ये सुरक्षेची भावना निर्माण होण्यासाठी पालघर जिल्हा पोलीस दलाने १६ पोलीस ठाणे हद्दीमध्ये २९ महत्वाच्या ठिकाणी एकाच वेळी नाकाबंदी लावली होती. तसेच पहाटेच्या वेळी गुन्हेगारांच्या आश्रयस्थान असलेल्या एकुण २१ वस्त्यामध्ये एकाचवेळी कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. अत्यंत परिणामकारकपणे झालेल्या या **"ऑपरेशन ऑल आऊट"** मध्ये खालीलप्रमाणे महत्वाची कामगीरी करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | विवरण | माहिती/कारवाई |
|---|---|---|
| १. | अभियानात सहभागी झालेले पोलीस अधिकारी/अंमलदार | १. पोलीस अधीक्षक-१<br>२. अपर पोलीस अधीक्षक- १<br>३. उप विभागीय पोलीस अधिकारी- ३<br>४. पोलीस निरीक्षक- ९<br>५. सहा.पोलीस निरीक्षक- १३<br>६. पोलीस उप निरीक्षक- ३६<br>७. पोलीस अंमलदार- ३२३ |
| २. | ऑपरेशनची वेळ | दिनांक-२३.०८.२०२२ रोजी १०.०० वा ते २२.०० वा. पावेतो. |
| ३. | उद्देश | जिल्हयातील सर्व गुन्हेगारांवर कारवाई करणे व कायद्याचा वचक बसविणे. |
| ४. | एकुण नाकाबंदी | १६ पोलीस ठाणे हद्दीत २९ ठिकाणी. |
| ५. | एकुण कोम्बिंग ऑपरेशन | १६ पोलीस ठाणे हद्दीत २१ ठिकाणी. |
| ६. | तपासलेले हिस्ट्रीशिटर | १२७ |
| ७. | तपासलेले पाहिजे आरोपी | ०६ अटक/कमी केले. |
| ८. | मालमत्तेचे गुन्हे करणारे सराईत गुन्हेगार | ३५ आरोपींची तपासणी. |
| ९. | वॉरंट/समन्स बजावणी | ३५ वॉरंट व ११९ समन्सची बजावणी केली. |
| १०. | दारुबंदी कायद्यान्वये दाखल गुन्हे | २१ गुन्हे दाखल करुन ६८,६४४/- रुपयाचा मुद्देमाल जप्त. |
| ११. | अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये | २ गुन्हे दाखल |
| १२. | सी.आर.पी.सी. कलम ११० प्रमाणे केलेली कारवाई | ४ |
| १३. | सी.आर.पी.सी. कलम १०९ प्रमाणे केलेली कारवाई | ४१ |
| १४. | सी.आर.पी.सी. कलम १०७ प्रमाणे केलेली कारवाई | ८५ |
| १५. | मोटर वाहन कायदा १९८८ प्रमाणे केलेली कारवाई | २६१ वाहन धारकांवर कारवाई करुन १,०८,८००/- रुपये किंमतीचा दंड वसूल करण्यात आलेला आहे. |
| १६. | इतर केसेस | १) भा.द.वि. कलम २८३ व २८५ प्रमाणे ३६ केस<br>२) कोटपा कायद्यान्वये २० केसेस ४,०००/- रु.दंड<br>३) मुंबई पोलीस अधिनियम कलम-१२२ प्रमाणे ०१ केस |

सदरचे ऑपरेशन हे श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर व श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पाडण्यात आले.